| CNR No.MHKO200002642023 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | – | ०४ | ०७ | २०२३ |
| | नोंदणी तारीख | – | ०४ | ०७ | २०२३ |
| | निकाल तारीख | – | १२ | ०५ | २०२६ |
| | कालावधी | | वर्ष | महिने | दिवस. |
| | | | ०२ | १० | ०८ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात (पिठासीन अधिकारी व्ही.ए.लावंड–कोकाटे )**

**नियमित फौजदारी खटला क्रमांक ४९/२०२३.**
**न्यायनिर्णय निशाणी क्रमांक ३४/ब**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक– १२ मे २०२६**

पन्हाळा पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रं.१९/२०२३ भारतीय दंड संहिता कलम ३२४,३२३,५०४ प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पन्हाळा पोलीस ठाणे,<br>ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | | ॲड. श्री. पी.एच.सावंत |
| आरोपी | | अक्षय आनंदा माने, व.व.२६, |
| | | रा. यवलुज, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर |
| आरोपीतर्फे वकील | | ॲड. श्री. व्ही. एस. पाटील |

**भाग–ब**
**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ०५.०२.२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ०६.०२.२०२३ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | ०४.०७.२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | ०६.०९.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | ०४.०४.२०२५ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | – |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १२.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | – |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायेजित (Set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अक्षय आनंदा माने | फौ.प्र.सं. कलम ४१(अ)(१) प्रमाणे नोटीस | ०६.०९. २०२३ | भा.द.सं. कलम ३२४, ३२३, ५०४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | – | – |

## <u>भाग–क</u>

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | रंगराव दिनकर कोले | फिर्यादी | १४ |
| २. | सचिन रंगराव कोले | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | १७ |
| ३. | युवराज भरत कोले | घटनास्थळ व जप्ती पंच | २४ |
| ४. | दगडू जोतीराम पाटील | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | २७ |
| ५. | वैशाली विकास राजपाल | तपासी अंमलदार | २८ |

**ब–बचावपक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| –– | निरंक | –– | –– |

**क. न्यायालयामार्फत**

| **सा.क्रं.** | **साक्षीदारांचे नांव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| -- | निरंक | -- | -- |

**अभियोगपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी**

**अ. अभियोग पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | १५ | फिर्याद |
| २. | २५ | घटनास्थळ व जप्ती पंचनामा |
| ३. | २९ | तपासाचा आदेश |
| ४. | ३० | फौ.प्र.स. कलम ४१अ नोटीस |
| ५. | ३१ | वैदयकीय प्रमाणपत्र मिळणे कामी पाठवलेले पत्र |
| ६. | आर्टीकल ब | घटनास्थळाचा फोटो |
| ७. | आर्टीकल क | घटनास्थळाचा नकाशा |

**ब. बचाव पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | ६ | दोषारोप |
| ३. | ७ | आरोपींचे निवेदन |
| ४. | ३३ | आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन |

**ड. भौतिक वस्तु**

| **अ.क्रं.** | **मुद्देमाल अर्टीकल नं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | आर्टीकल अ | पिवळसर व हिरवट रंगाची डिझाईन असलेली |

| | | |
|---|---|---|
| | | प्लॅस्टीकची मुठ ९ से.मी. असलेली व मुठीस लागुन होका यंत्र व १६ से.मी. ची स्टीलची पाती पुढे निमुळती टेक असलेली साडेतीन से.मी.रुंदीचा त्यामध्ये चार लहान मोठी होल असलेली पाती व त्याचे एक बाजुस धार व एक बाजुस ४ से.मी. दात्री असलल्या मुठीच्या कडेला होकायंत्र समोर USA SABER असे इंग्रजी अक्षरामध्ये लिहीलेला |

## न्या य नि र्ण य
## (दिनांक १२ मे २०२६ रोजी घोषित केले)

आरोपी यांचे विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४,३२३,५०४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याची चौकशी झालेली आहे.

**०२.** अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, दि.०५/०२/२०२३ रोजी रात्री ०८.३० वाजताचे सुमारास यवलुज, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील फिर्यादी यांचे घराचे समोर आरोपी अक्षय आनंदा माने याने येवुन फिर्यादीला शिवीगाळ करीत तु ०१/०१/२०२३ रोजी राधाकृष्ण सहकारी दुध संस्थेची निवडणुक झालेवर त्यांचे घरासमोरुन ट्रॅक्टर का फिरवलास असे म्हणत फिर्यादीची गळपट्टी धरुन त्याला लाथाबुक्कयांनी मारहाण केली. फिर्यादी व फिर्यादीचा मुलाने आरोपीस समजावुन सांगुन दारु पिला असल्याने घरी जाणेस सांगुनही आरोपी ऐकत नसल्याने फिर्यादीचा मुलगा सचिन याने आरोपीचे वडील आनंदा माने यांना बोलावुन घेतले. सदरचे भांडण फिर्यादीचा मुलगा सचिन कोले, संभाजी पाटील, संदिप कोतोलीकर, दगडू पाटील तसेच त्याचे वडील आनंदा माने फिर्यादीला सोडवले त्याच वेळी आरोपी अक्षय माने याने त्याचे हातातील चाकुने फिर्यादीचे डावे हाताचे मनगटावर मारले असता फिर्यादीला जखम होवुन रक्त येवु लागले. फिर्यादीच्या मुलाने फिर्यादीला उपचारासाठी सी.पी.आर. हॉस्पीटल कोल्हापूर येथे दाखल केले. उपचार केल्यानंतर फिर्यादीने आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली.

०३. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपीविरुध्द पन्हाळा पोलीस ठाणे गु.र.क्र.१९/२०२३ भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४,३२३,५०४,५०६ अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंद झाला. सदर गुन्हयाचा तपास महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल व्ही. व्ही. राजपाल यांनी केला असुन त्यांनी तपासा दरम्यान घटनास्थळ पंचनामा नोंदवला, साक्षीदारांचे तपास टिपण्णे नोंदवली, हत्यार जप्तीचा पंचनामा केला, जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र व इतर कागदपत्र प्राप्त करुन कामात सामील केली व केलेल्या तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले आहे.

०४. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द नि.क्र.६ नुसार भारतीय दंड संहिता कलम ३२४,३२३,५०४ अन्वये शिक्षापात्र अपराध केल्याचा दोषारोप ठेवला व आरोपीस दोषारोप मराठीत वाचून व समजावून सांगण्यात आला असता त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविल्याने तसे त्यांचे निवेदन नि.क्र.७ वर नोंदविण्यात आले.

०५. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता एकुण पाच साक्षीदारांचा साक्षीपुरावा तपासला असुन अभियोगपक्षाने काही कागदोपत्री पुराव्यांचा देखील आधार घेतला असुन त्यांचा उल्लेख पुढे विश्लेषनादरम्यान योग्य त्याठिकाणी करण्यात आला आहे. तद्नंतर अभियोगपक्षाने नि.क्र.३२ अन्वये पुरावा बंद करत असलेचे न्यायालयास कळवले. त्यानंतर आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नि.क्र.३ कडे नोंदवले असता आरोपीने खोटी केस केल्याचा बचाव घेतला परंतु, आपल्या बचावापृष्ठयार्थ कोणताही साक्षीदार तपासला नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०६. उपलब्ध पुराव्यावरुन खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष त्या खालील नमूद कारणानुसार नोंदविले आहेत–

| अ.क्र. | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, दि.०५/०२/२०२३ रोजी रात्री ०८.३० वाजताचे सुमारास यवलुज, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील फिर्यादीचे घरासमोर आरोपीने हत्यार म्हणुन वापरलेस मृत्यू होईल अशा प्राणखातक चाकुने फिर्यादी रंगराव यांना मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ३२४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी. |
| २. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादी यांना लाथाबुक्कयांनी मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ३२३अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ३. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादी यांना शिवीगाळ करुन त्यांचा उद्देशपुर्वक अपमान करुन त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे प्रक्षोभीत केले व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ५०४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ४. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोषमुक्तता करणेत येते. |

## का र ण मि मां सा

**प्रश्नबिंदू क्र.१ ते ३ करीताः**

**०७.** ज्याअर्थी प्रश्नबिंदू क्र.१ ते ३ मधील नमुद अपराधासंदर्भातील वस्तुस्थिती व पुरावा हा एकमेकांशी संबंधीत आहे, त्याअर्थी या संदर्भातील विश्लेषणात्मक पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर प्रश्नबिंदूंचे विश्लेषण एकत्रित केले आहे. अभियोगपक्षाने संबंधित अधिनियमातील कलमांच्या परिभाषेत आरोपीचे कृत्य येते हे शंकेपलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. हे पाहण्याकरीता अभियोगपक्षाने सादर

केलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

०८. प्रस्तुत प्रकरणातील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाचे मुख्य साक्षीदार क्र.१ रंगराव दिनकर कोले **(फिर्यादी व जखमी/नि.क्र.१४)** यांनी त्यांचे मौखीक पुराव्यात असे कथन केले आहे की, ते आरोपी अक्षय माने यांना ओळखतात कारण तो देखील त्यांच्याच गावात राहणारा आहे. जानेवारी २०२३ मध्ये त्यांच्या गावात राधा कृष्ण दुध डेअरी यांच्या निवडणुका दि.०१/०१/२०२३ रोजी शांततेत पार पाडल्या. दि.०५/०२/२०२३ रोजी रात्री ८.३० सुमारास त्यांच्या घरी ते, त्यांची पत्नी, मुलगा हजर असताना आरोपी जोरजोरात शिवीगाळ करु लागला. ते घराबाहेर पडल्यावर आरोपीने त्याला लाथाबुक्याने मारण्यास सुरुवात केली. त्यांचा मुलगा सचिन याने आरोपी अक्षय यांचे वडील आनंदा माने यांना बोलावून घेतले. आरोपीच्या वडीलांनी आरोपीस थांबवणेस प्रयत्न केला परंतू त्यांचे देखील आरोपीने ऐकले नाही. आरोपीने त्यांच्याकडे माझा वडीलांना का बोलावून आणले अशी विचारणा केली. त्याठिकाणी संभाजी पाटील, संदीप कोतोलीकर, दगडू पाटील यांनी सोडवासोडव केली. आरोपीने त्याच्या कमरेला असलेल्या चाकुने त्याच्या डाव्या हातावर वार केला. वार केल्यामुळे रक्तस्त्राव होवू लागला. त्याचा मुलगा सचिन याने त्याला कोल्हापूर येथील सरकारी दवाखान्यात उपचाराकरीता नेले. उपचार घेवून झाल्यावर त्याने त्याच्या मुलासोबत पन्हाळा पोलीस स्टेशनला आरोपी विरुध्द फिर्याद (नि.क्र.१५) दिली. ज्या चाकुने त्याला मारहाण झाली तो मुद्देमाल चाकू (आर्टीकल अ) त्याला दाखवला असता तो तोच आहे असे त्याने सांगितले. दि.०१/०१/२०२३ रोजी त्याने राधा कृष्ण दुध डेअरीच्या प्रांगणातून त्याच्या मालकीचा ट्रॅक्टर फिरविल्याचा राग मनात धरुन आरोपीने त्याला मारहाण केली.

०९. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ सचिन रंगराव कोले **(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार/नि.क्र.१७)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, मुळ फिर्यादी

रंगराव कोले हे त्याचे वडील आहेत व आरोपी अक्षय माने याला ओळखतो कारण तो त्यांच्याच गावात राहणारा आहे. दि.०५/०२/२०२३ रोजी रात्री ८.३० च्या सुमारास ते त्यांच्या घरी जेवण करुन बसले होते. त्याच सुमारास अक्षय त्यांच्या घरी आला व त्यांना शिवीगाळ करु लागला व त्यावेळी तो व त्याचे वडील बाहेर आले त्यावेळी अक्षय दारु प्यायला होता. त्याने व त्याचे वडील त्याला समजून सांगण्याचा प्रयत्न करत होते परंतू तो ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याने त्याने त्याच्या वडीलांना बोलावून आणले. त्यानंतर अक्षय त्याच्यावर व त्याच्या वडीलांच्यावर जास्त चिडला व रागाच्या भरात त्याने त्याच्या वडीलांना लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्याने त्याच्या कमरेला लावलेला चाकू काढला व त्याच्या वडीलांच्या डाव्या हाताला वार केला. सदर मारहाणीत त्याच्या वडीलांना जखम झाल्याने त्यांनी त्यांना उपचाराकरीता सी.पी.आर. हॉस्पीटल कोल्हापूरला नेले. घटनेबाबत त्याच्या वडीलांनी पन्हाळा पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. अक्षय माने याने त्याच्या वडीलांना ज्या चाकुने (आर्टीकल अ) मारले तो दाखवला असता तो तोच आहे असे सांगितले.

**१०.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.४ दगडू जोतीराम पाटील **(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार/नि.क्र.२७)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, सन २०२३ ते त्यांचे कुटूंबात आई–वडील, पत्नी व मुले यांचे सोबत राहत होते. त्यांचे शेजारी रंगराव दिनकर कोले यांचे घर आहे. सन २०२३ साली राधाकृष्ण दुध संस्थेची निवडणूक झाली.दि.०५/०२/२०२३ रोजी रंगराव कोले व अक्षय माने यांच्यात रंगराव कोले यांच्या दारात भांडणे चालू होती. सदरची भांडणे कशावरुन झाली हे त्याला माहित नाही परंतु त्याने सोडवासोडव केली. सदर भांडणात रंगराव दिनकर कोले हे जखमी झाले होते. सदर मारहाणीची घटना त्याचे समक्ष झालेली आहे. पोलीसांनी त्याचा जबाब नोंदवला.

**११.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ युवराज भरत कोले **(घटनास्थळ व**

**जप्ती पंच/नि.क्र.२४)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि.०६/०२/२०२३ रोजी त्याला पन्हाळा पोलीसांनी फिर्यादी रंगराव दिनकर कोले यांच्या घरासमोर बोलावले होते. फिर्यादी व आरोपी यांच्यात दि.०५/०२/२०२३ भांडणे झाली होती व दुस-या दिवशी त्याला पोलीसांनी बोलावून घेतले व मुद्देमाल जप्ती पंचनामा व घटनास्थळ पंचनाम नोंदवून घेतला. त्यावेळी त्याच्या सोबत दुसरे पंच त्याचे चुलते हरिभाऊ दिनकर कोले हे देखील हजर होते. घटनास्थळ त्यांना फिर्यादीने दाखवले. प्रस्तूत गुन्हयातील चाकू हा गटरच्या शेजारी पडला होता तो पोलीसांनी त्याच्या समक्ष जप्ती पंचनामा नोदंवून जप्त करुन घेतला. सदरच्या चाकूने आरोपी अक्षय माने याने फिर्यादीस हाताच्या मनगटावर मारला होता.त्याला घटनास्थळ व जप्ती पंचनामा (नि.क्र.२५) दाखवला तो तोच आहे, त्यावर त्याची अनुक्रमांक २ वर सही आहे असे सांगितले. त्याला घटनास्थळी काढलेला एकच फोटो (आर्टीकल ब) दाखवला तो तोच आहे असे सांगितले. त्याला सदरचा चाकू (आर्टीकल अ) दाखवला तो तोच आहे. तो आर्टीकल अ वर दाखल आहे असे कथन केले.

१२. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.५ वैशाली विकास राजपाल **(तपासी अंमलदार/नि.क्र.२८)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि.१०/०२/२३ रोजी त्या पन्हाळा पोलीस स्टेशनला पोलीस हवालदार म्हणून कार्यरत असताना त्यांना गु.र.न. १९/२३ चा तपास करणेकामीचा लेखी आदेश (नि.क्र.२९) प्राप्त झाला. लेखी आदेशासोबत फिर्याद, छापील प्रथम खबरी अहवाल प्राप्त झाले. त्यानंतर त्यांनी दि.१०/०२/२३ रोजी दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा नोंदवला. घटनास्थळ हे यवलूज गावातील रंगराव कोले यांचे घरासमोरील जागा आहे.त्यानंतर त्यांनी घटनास्थळावरुन दोन पंचासमक्ष हत्यार चाकू जप्त केला. तो त्यांना दाखवला तो तोच आसुन आर्टीकल अ वर दाखल आहे. घटनास्थळ व जप्ती पंचनामा नोंदवला. त्यांना सदरचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवला तो तोच निशाणी क्र २५ वर दाखल आहे. त्यांना घटनास्थळाचा नकाशा व फोटो हे आर्टीकल

ब व क दाखल आहेत. त्यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१ अ (नि.क्र.३०) ची नोटीस दाखवली ती तीच आहे असे सांगितले त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे तपास टिपण नोंदवले. त्यानंतर जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र मिळणेकामीचे पत्र (नि.क्र.३१) पाठवले. वैदयकीय प्रमाणपत्र दि.०८/०५/२०२३ रोजी प्राप्त झाले. तपासाअंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झालेने आरोपी विरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. आरोपीला ते ओळखतात.

**१३.** अशा प्रकारे उपरोक्त प्रमाणे अभियोगपक्षाच्या साक्षीदारांचा सरतपास पटलावर आला असताना सदर साक्षीदारांच्या एकूणच मौखिक पुराव्याचे मूल्यमापन करण्याकरीता त्यांचा सरतपास हा उलटतपासामध्ये देखील अबाधित राहिला आहे काय हे पाहणे आवश्यक आहे. त्यामुळे साक्षीदारांचा उलटतपास पुढीलप्रमाणे –

**१४.** साक्षीदार क्र.१ रंगराव दिनकर कोले **(फिर्यादी व जखमी/नि.क्र.१४)** यांनी त्यांचे आरोपीतर्फे नोंदवलेल्या उलटतपासामध्ये असे कबुल केले आहे की, हरी दिनकर कोले हा त्यांचा सख्खा भाउ आहे. युवराज कोले हा त्यांना नात्याने पुतण्या लागतो. संभाजी पाटील व दगडु पाटील यांच्यासोबत त्यांचे चांगले संबंध आहेत. कारण ते त्यांच्याच गावातील राहणारे आहेत. संदीप कोतोलीकर हा त्यांच्या मुलाचा मित्र असल्याकारणाने त्यांचे एकमेकांच्या घरी जाणे–येणे असते. सचिन कोले हा त्यांचा मुलगा आहे. जखम त्यांना जास्त खोल लागली नसल्याने रक्तस्त्राव होत नव्हता. आरोपी हा त्यांच्या भावकीतील नसल्याने त्यांच्याशी त्यांचा काहीही संबंध नाही. राधाकृष्ण संस्थेचे ते चेअरमन आहेत. आरोपी हा राधाकृष्ण संस्थेचा सभासद नाही. आरोपी अक्षय माने यांचा सदर संस्थेशी काहीही संबंध नाही. उर्वरीत प्रश्नांना त्यांनी नाकबुल उत्तरे नोंदविली.

**१५.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ सचिन रंगराव कोले **(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार/नि.क्र.१७)** यांचे उलटतपसामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, हरी

दिनकर कोले हे त्यांचे सख्खे चुलते आहेत. युवराज भरत कोले हा त्यांचा चुलत भाउ आहे. दि. ०५.०२.२०२३ रोजी घटनेची फिर्याद पन्हाळा पोलीस स्टेशनला रात्री १० ते १०.३० च्या सुमारास दिली. आर्टिकल अ वरील चाकू हा दररोज वापरातील नाही. प्रकाश कोले हा त्यांचा मित्र आहे. परंतु त्याचे घर सदर साक्षीदाराच्या घरापासून अंदाजे अर्धा किलोमीटर अंतरावर आहे. उर्वरीत प्रश्नांना नाकबुल उत्तरे नोंदविली.

**१६.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.४ दगडू जोतीराम पाटील **(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार/नि.क्र.२७)** यांचे उलटतपसामध्ये असे मान्य केले आहे की, घटना किती तारखेला घडली याविषयी त्यांना सांगता आले नाही. फिर्यादी रंगरावला त्यांचे समक्ष कोणतीही दुखापत झालेली नव्हती. रंगरावने त्याच्या दुध डेअरीच्या निवडणुकीच्या कारणावरून तक्रार दिलेली आहे. उर्वरीत प्रश्नांना नाकबुल उत्तरे नोंदविली.

**१७.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ युवराज भरत कोले **(घटनास्थळ व जप्ती पंच/नि.क्र.२४)** यांचे उलटतपसामध्ये असे मान्य केले आहे की, पोलीसांनी त्यांच्या तयार पंचनाम्यावर सहया घेतल्या. पोलीसांनी जो चाकू जप्त करून घेतला तो त्यांच्या चुलत्यांनी पोलीसांना दिला होता. त्यांनी स्वतः किंवा पोलीसांनी जागेचे व चाकूचे मोजमाप त्यांच्या समक्ष करून घेतले नाही. त्यांनी पोलीसांच्या सांगण्यावरून पंचनाम्यावर सही केली. तो पंचनामा त्यांनी वाचून पाहिला नाही. त्यांनी मागच्या तारखेला पहिल्यांदाच पंचनामा वाचला व त्यानुसार साक्ष दिली. नि. २५ वरील पंचनाम्यावर पोलीसांनी काय मजकूर नमूद करून घेतला आहे याविषयी त्यांना माहिती नाही. केवळ पंचनाम्यावर अनुक्रमांक २ ला त्यांची सही असल्याने त्यांनी प्रत्यक्ष पंचनामा करतेवेळी हजर नसलेले त्यातील मजकूर बरोबर असल्याचे सांगत आहे.

**१८.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.५ वैशाली विकास राजपाल **(तपासी अंमलदार/नि.क्र.२८)** यांचे उलटतपसामध्ये असे मान्य केले आहे की, त्यांना प्रस्तुत कामातील तपासाचा लेखी आदेश मिळाला होता. पंरतु त्यावर कोणाची सही आहे हे

त्यांना माहित नाही. त्यांनी फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे घटनास्थळ पंचनामा नोंदविला. आर्टिकल अ वर दाखल असलेला चाकू त्यांनी आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेला नाही. घटनास्थळी चाकू कसा आला या अनुषंगाने त्यांनी तपास केला नाही. घटनास्थळी रक्ताचे डाग पडले नव्हते. फिर्यादीच्या रक्ताचे नमुने तपासाकामी घेवून ते प्रयोगशाळेत पाठवले तसेच चाकू हा तपासणीकामी न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवला नाही.

**१९.** एकंदरीत अभिलेखावरील अभियोगपक्षाच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, साक्षीदार क्र.१ रंगराव दिनकर कोले यांनी त्यांच्या उलटतपासादरम्यान असे मान्य केले आहे की हरी कोले हा त्यांचा सख्खा भाउ असून युवराज कोले हा पुतण्या आहे. संदीप कोतोलीकर हा त्यांच्या मुलाचा मित्र आहे. आरोपी हा त्यांच्या भावकीतील राहणारा नसून आरोपीशी त्यांचे कोणतेही संबंध नाही. साक्षीदार क्रं.२ सचिन कोले यांनी घटना दि. ०५.०२.२०२३ रोजी घडल्याचे सांगितले. त्याचबरोबर आर्टिकल अ वरील चाकू हा दररोज वापरातील नसल्याचे त्यांनी कबूल केले. प्रकाश कोले हा त्यांचा मित्र आहे परंतु त्याचे घर त्यांच्या घरापासून किती किलोमीटर अंतरावरती आहे हे त्यांना सांगता आले नाही. साक्षीदार क्रं. ४ दगडू जोतीराम पाटील यांनी फिर्यादीला त्यांच्या समक्ष कोणतीही दुखापत झालेली नव्हती असे मान्य केले. साक्षीदार क्रं.३ युवराज भरत कोले यांनी पोलीसांच्या सांगण्यावरून पंचनाम्यावर सहया केल्या. नि.२५ वरील पंचनाम्यावर पोलीसांनी काय मजकूर नमूद करून ठेवले याविषयी त्यांना माहित नाही. साक्षीदार क्रं.५ तपासी अंमलदार वैशाली राजपाल यांनी त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, लेखी आदेशावर कोणाची सही आहे हे त्यांना सांगता आले नाही. त्याचबरोबर घटनास्थळी आर्टिकल अ वरील चाकू त्यांनी आरोपीच्या ताब्यातून जप्त करून घेतला नाही. यावरूनच प्रस्तुतचा गुन्हा आरोपीने केला किंवा कसे यावर शंका निर्माण होते. एकंदरीत अभिलेखावर दाखल असलेला पुरावा हा आरोपीवरील आरोप सिध्द करण्याकरीता अपुरा असल्याने

त्याचा फायदा निश्चितच आरोपींच्या पक्षास जातो सबब, वरील सर्व विवेचनांचा विचार करता **<u>प्रश्नबिंदू क्रं.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.</u>**

**<u>प्रश्नबिंदू क्र.४ करीताः</u>**

**२०.** प्रश्नबिंदू क्र.१ ते ३ च्या उत्तरानुसार अभियोगपक्षाद्वारे भारतीय दंड संहिता कलम ३२४,३२३,५०४ प्रमाणे आरोपींवर असलेले आरोप सिध्द होण्याइतपत कोणताही सबळ व विश्वासार्ह साक्षी पुरावा प्रस्तुत प्रकरणात आलेला नसल्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल चाकू हा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे त्यांचा नाश करण्यात यावा. सबब, प्रश्नबिंदू क्र.४ चे उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे–

**<u>आदेश</u>**

१. आरोपी अक्षय आनंदा माने, रा. यवलुज, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर याची भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम ३२४,३२३,५०४ प्रमाणे चे अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

२. आरोपींची वैयक्तीक व जामीन बंधपत्रे रद्द करण्यात आले आहेत.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे पूर्तता करणेकामी प्रत्येकी रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व तेवढयाच रकमेचा जामीन दयावा.

४. जप्त मुद्देमाल चाकू याचा अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by Vaishali Amol Lavand-Kokate
Date: 2026.05.12 18:16:19 +0530

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)

दिनांक –१२.०५.२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कळे–खेरीवडे. कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर